Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

ISSUE No- (CCCXVI) 316

September -2021

National E-Conference on

## Socio-Religious and Political Movements in the Pre-independence Period and Today



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive-Editor**
**Dr. Nilima D. Deshmukh**
Principal
Sahakar Maharshi Late Bhaskarrao
Shingne Arts College,
Khamgaon, Dist. Buldana

**Executive-Editor**
**Dr. J. B. Devhade**
Principal
Late Pushpadevi Patil Art's and Science
College, Risod, Dist.Washim

**Editors**
**Dr. Pramod R.Chavan**
Associate Professor & HOD,Deparment of History
Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College,
Khamgaon, Dist. Buldana

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

ISSUE No- (CCCXVI) 316

September -2021

National E-Conference on

## Socio-Religious and Political Movements in the Pre-independence Period and Today



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive-Editor
Dr. Nilima D. Deshmukh
Principal
Sahakar Maharshi Late Bhaskarrao
Shingne Arts College,
Khamgaon, Dist. Buldana

Executive-Editor
Dr. J. B. Devhade
Principal
Late Pushpadevi Patil Art's and Science
College, Risod, Dist.Washim

Editor
Dr. Pramod R.Chavan
Associate Professor & HOD,Deparment of History
Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College,
Khamgaon, Dist. Buldana

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)

For Details Visit To : www.aadharsocial.com Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 18 | स्वामी विवेकानंदाने भारताच्या उन्नतीकरिता केलेले कार्य **डॉ. श्रीकांत म. सोनटक्के** | 76 |
| 19 | संत गाडगेबाबांच्या समाजसुधारणांची स्वातंत्र्यत्तर फलश्रुती **डॉ. ओमप्रकाश सा. बोबडे** | 79 |
| 20 | डॉ. ॲनी बेजंट व होमरूल चळवळ **प्रा. डॉ. सिध्दार्थ शिवाजी वाठोरे** | 82 |
| 21 | राष्ट्र उभारणीमध्ये श्रमिक महिलांचे योगदान **प्रा. डॉ. गजानन लिंबाराव सोडनर** | 85 |
| 22 | भारतीय राष्ट्रीय चळवळीत महिलांचे योगदान **डॉ राजाराम रा पिंपळपल्ले / सिंधू निवृत्ती लोणकर** | 88 |
| 23 | स्वातंत्र्यपूर्व काळात नागपूर जिल्हयातील समाजकार्यात महिलांचे योगदान **प्रा. राजेन्द्र एम. देवाळकर** | 93 |
| 24 | जुनागड संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरणांमध्ये सरदार वल्लभभाई पटेलांचे योगदान – एक दृष्टीक्षेप **प्रा. डॉ. पी. आर. जुनघरे** | 97 |
| 25 | हैदराबाद मुक्तीसंग्राम लढ्यतील युवा किंगमेकर — कै बाबुरावजी काळे **प्रा भास्कर टेकाळे** | 101 |
| 26 | भारतीय स्वातंर्त्य चळवळीत महिलांची भूमिका **सरस्वती निवृत्ती सोनाळे** | 103 |
| 27 | महात्मा फुले यांचे अस्पृष्यता विषयक विचार—एक अभ्यास **परमेश्वर शेषराव सुर्वे** | 108 |
| 28 | सामाजिक संस्था व समाजसुधारकांचे योगदान **डॉ.जगदीश दयासागर हेंडवे** | 113 |
| 29 | महात्मा फुले यांची धर्मचिकित्सा —एक चितंन **फकिरा भगवान राजगुरू** | 116 |
| 30 | स्वातंत्र्यपूर्व काळात महिला सक्षमीकरणासाठी समाजसुधारकांचे योगदान **डॉ. अनिल एन. ठाकरे** | 121 |
| 31 | वीरांगना राणी अवंतीबाई **प्रा.डॉ.किशोरकुमार आर. नागपुरे** | 123 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन **प्रा. डॉ. शिला कमलाकर स्वामी** | 127 |
| 33 | ग्रंथकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर **श्रीमती मंजुषा कमलाकर स्वामी** | 131 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मचिकित्सा **विकास गवई** | 133 |
| 35 | महाराष्ट्रातील सुधारणा चळवळ **रत्नमाला वेलदोडे** | 136 |
| 36 | कॉ.कमल भागवत यांचे महाराष्ट्रातील कामगार चळवळीतील योगदान प्रा.डॉ.संतोष रोहिदास पहारे | 139 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 316 (CCCXVI )
ISSN : 2278-9308
September, 2021

# जुनागड संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरणांमध्ये सरदार वल्लभभाई पटेलांचे योगदान – एक दृष्टीक्षेप

प्रा. डॉ. पी. आर. जुनघरे
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर जि. बुलढाणा
मो. ९८२२५३०१७१ ,Email. parmeshwarjunghare07@gmail.com

प्रस्तावना –

१८ जुलै १९४७ रोजी ब्रिटीश पार्लमेंटने भारतीय स्वातंत्र्याचे विधेयक मंजूर केले. त्यानुसार १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारत व पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे निर्माण होऊन ब्रिटीश पार्लमेंटची सत्ता समाप्त झाली. त्याचबरोबर भारतीय संस्थानिकावर असलेली ब्रिटीश पार्लमेंट व राजघराण्याची सत्ता समाप्त होवून त्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार प्रदान करण्यात आला. त्यांनी भारत किंवा पाकिस्तानमध्ये सामील व्हावे किंवा स्वतंत्र राहावे असा त्याचा अर्थ होता. त्याचबरोबर ब्रिटीश काळात संस्थानाचा कारभार पाहणारे 'पोलीटिकल डिपार्टमेंट' अस्तित्वात राहणार नव्हते. त्याऐवजी 'स्टेट डिपार्टमेंट' नावाचे खाते निर्माण करण्यात येवून त्यांची जबाबदारी सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावर सोपविण्यात आली. ५ जुलै १९४७ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांनी एक पत्रक काढून सर्व संस्थानिकांना भारतीय संघराज्यात सामील होण्याचे आवाहन केले. त्यानुसार अनेक संस्थानिकांनी प्रतिसाद दिला. भारतीय संघराज्यात सामील होण्याच्या दस्तऐवजावर स्वाक्षऱ्या केल्यात. परंतु जुनागड नबाब महाबतखान याने मात्र भारतीय संघराज्यात सामील होण्यास नकार दिला. त्यामुळे लष्करी कारवाईद्वारे सरदार वल्लभभाई पटेल यांनी जुनागड संस्थान भारतीय संघराज्यात विलीन केले.

• जुनागड संस्थानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

"आदौ मणिपुरमं नामं, चंद्रकेतुपुरं स्मृत: ।
तृतीय रेवत नामं कलो पौरातन पुरं ॥

सुमारे २५०० वर्षापुर्वी प्रसिध्द संस्कृत पंडित पाणिनी यांच्या लेखनीमधून खास गिरीराज गिरनारसाठी वरील क्षोक निर्माण झाला. या गिरीराज गिरनारच्या कुशीत विराजमान झाले आहे जुनागड संस्थान. मानव धर्माचा पुरस्कार करून भक्ती विश्वात क्रांतीकारी संत म्हणून ज्याची ओळख आहे त्या नरसी मेहतांची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणून जुनागड प्रसिध्द आहे. जुनागड राज्यांचा इतिहास थेट मौर्य युगापासून सुरू होतो. मौर्याच्या ताब्यात सौराष्ट्राचा प्रदेश होता. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुष्यगुप्त नावाच्या सरदाराची नियुक्ती करण्यात आली होती. मौर्यकाळात शेतीला पाणी देण्यासाठी 'सुदर्शन' नावाच्या तलावाची निर्मिती करण्यात आली. मौर्य राजवटीनंतर शक क्षत्रपांचे राज्य जुनागडवर होते. गुप्त घराण्याची सुध्दा सत्ता जुनागडवर होती. त्यानंतर चुडासमा, तुर्क, मुगल इत्यादी शासकांचे अधिपत्य जुनागडवर होते. इ.स. १७०७ मध्ये बादशहा औरंगजेबाचा मृत्यू झाला त्यानंतर मुगल वर्चस्वाखालील अनेक शासक स्वतंत्र झाले. त्यामध्ये जुनागडचा सुभेदार शेरखान बाबीचा समावेश होता.

• स्वतंत्र जुनागड राज्याची निर्मिती

शेरखान बाबी नावाच्या मुगल सरदाराने इ.स. १५३० मध्ये स्वतंत्र जुनागड राज्याची स्थापना केली. त्यानंतर महाबतखान पहिला, हमीदखान, बहादुरखान दुसरा, हमीदखान दुसरा, महाबतखान दुसरा,बहादुरखान खान रसुलखान आणि महाबतखान तिसरा इत्यादी सुलतान जुनागडच्या राजगादीवर येवून गेले. त्यामध्ये महाबतखान तिसरा शेवटचा सुलतान चैनी विलासी तर होताच परंतु त्यांचे कुत्राप्रेम अजब स्वरूपाचे होते. त्याने देशी विदेशी जातीचे ३०० कुत्रे पाळली होती. या सर्वाचे पालनपोषण तो आपल्या कुटुंबाप्रमाणे करीत असे तसेच या श्वान परिवारापैकी रोशन आरा नावाच्या कुत्रीचे लग्न त्याने लावून दिले. त्यासाठी ३ लाख २० हजार इतका

खर्च केला. त्यादिवशी सरकारी कार्यालयाला सुट्टी देण्यात आली. त्याने आपल्या संस्थानाचे स्वतंत्र नाणे निर्माण केले. ब्रिटिश शासनांने या संस्थानाला प्रथम वर्गाचा दर्जा दिला होता.

• सत्तेचे हस्तांतरण व जुनागड -

२५ जुलै १९४७ रोजी राजधानी दिल्लीमध्ये संस्थानिकांच्या परिषदेचे आयोजन करण्यात आले. हया परिषदेमध्ये जुनागड संस्थानाच्या वतीने जुनागडच्या दिवाणाचे बंधू नबीबक्ष सहभागी झाले त्यांनी भारतात सामील होण्यासाठी तयारी दर्शविली परंतु लवकरच जुनागडच्या दिवान पदावर शहानवाज भुट्टो यांची नियुक्ती झाली त्यांच्यावर बॅ. जीना यांच्या धोरणाचा प्रभाव असल्यामुळे त्यांनी सामीलनामा करारावर स्वाक्षरी करण्यास विलंब लावण्याला सुरवात केली भारत सरकारकडून त्याबाबत विचारणा झाली. परंतु १५ ऑगष्ट १९४७ रोजी जुनागड नवाबाने आपले संस्थान पाकिस्तानमध्ये विलीन केल्याची घोषणा केली. बॅ. जीना यांनी १३ सप्टेंबर १९४७ रोजी जुनागडच्या विलीनीकरणांस मान्यता दिली.

• बॅ. जीना व शहानवाज भुट्टो यांची कारस्थाने -

सत्तांतराच्या प्रक्रियेला सुरवात झाल्यानंतर काही संस्थाने त्यांना देण्यात आलेल्या स्वयंनिर्णयाच्या तत्वाच्या अनुषंगाने स्वतंत्र राहण्याचा विचार करीत होती या पार्श्वभूमीवर काठियावाड क्षेत्रातील जुनागड नावाचे संस्थान पाकिस्तानमध्ये विलीन करण्यासाठी बॅ. जीना जुनागडचा दिवान शहानवाज भुट्टो यांच्या माध्यमातून प्रयत्न करीत होते. बॅ. जीना यांनी शहानवाज भुट्टो यांना १५ ऑगष्टपर्यंत शांत राहण्याचा सल्ला दिला होता. तसेच जुनागडचे पाकिस्तानात विलीनीकरन करून पुढे त्याबदल्यात काश्मीर प्राप्त करण्याचा बॅ. जीना यांचा राजकीय डाव होता. त्यादृष्टीकोणातून जुनागडचा दिवान शहानवाज भुट्टो यांना त्यांनी सर्वप्रकारची मदत करण्याचे आश्वासन दिले होते.

• व्हाइसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांची भूमिका –

सत्तांतराच्या प्रक्रियेला प्रारंभ झाल्यानंतर राजधानी दिल्लीमध्ये संस्थानिकांच्या परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्या परिषदेमध्ये जुनागड संस्थानाच्या प्रतिनिधीने आपले संस्थान भारतात विलीन करण्याचे संकेत दिले परंतु त्यांनतर जुनागडने आपली भूमिका बदलली. फाळणीच्या नियमानुसार जुनागड भौगोलीक दृष्टीकोणातून कुठेही पाकिस्तानशी ज़ोडल्या गेले नव्हते. ८० % प्रजा हिंदू होती या पार्श्वभूमीवर व्हाइसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांनी ब्रिटनच्या राजाला पाठविलेल्या

अहवालात जुनागडला पाकिस्तानी क्षेत्र संबोधले. तसेच जुनागडचा प्रश्न युनोत घेवून जाण्याची सुचना भारत सरकारला केली. बाबरियावाड व मंग्रोलमध्ये लष्करी कारवाई करण्याचा निर्णय पटेलांनी घेतल्यानंतर त्याला लॉर्ड माउंटबॅटन यांनी विरोध केला. थोडक्यात माउंटबॅटन यांची भूमिका भारताच्या विरोधात होती. असे पत्र व्यवहारावरून सिध्द होते.

• जुनागड संदर्भात काठियावाड प्रजा परिषदेची भूमिका -

जुनागडचा नवाब महाबतखानाच्या निर्णयामुळे काठियावाडच्या ऐक्याला धोका निर्माण झाला. काठियावाड क्षेत्रातील सर्व संस्थानिकांनी जुनागडच्या निर्णयाचा तीव्र निषेध केला तसेच धंग्रधच्या महाराजांनी जुनागडच्या नवाबाला पत्र पाठवून आपल्या निर्णयाचा फेर विचार करण्याचा सल्ला दिला. नवानगरचे जामसाहेब दिल्लीला रवाना झाले. त्यांनी वल्लभभाई पटेलांची भेट घेवून काठियावाड जनतेच्या संतप्त भावना पटेलांपर्यंत पोहचविल्या. काठियावाड प्रजा परिषदेने सामळदास गांधी यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकारची स्थापना केली.

• भारत सरकारची घटनात्मक कारवाई -

जुनागडच्या नवाबाने पाकिस्तानात विलीनीकरणाची घोषणा केल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानच्या उच्चायुक्ताकडे तक्रार केली. तसेच पाकिस्तानचे प्रधानमंत्री लियाकतअली यांना जुनागडचे पाकिस्तानमध्ये विलीनीकरण संलग्नतेच्या दृष्टीने अयोग्य असल्याचे निदर्शनास आणून दिले. पाकिस्तानकडून अनुकूल प्रतिसाद न आल्यामुळे काठियावाड क्षेत्रातील जनतेच्या इच्छा व आकांक्षा लक्षात घेवून जुनागडवर लष्करी कारवाई करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. मंत्रीमंडळाने घेतलेला निर्णय नवाबापर्यंत पोहचविण्यासाठी व्हि. पी.

मेनन जुनागडला गेले. परंतु दिवान शहानवाज भुट्टो यांनी नवाबाची भेट होऊ दिली नाही. जुनागड संदर्भात सरदार पटेलांनी लष्करी कारवाईचा निर्णय घेतल्यानंतर प्रधानमंत्री नेहरूंनी सरदार पटेलांच्या भूमिकेचे समर्थन केले.

• काठियावाडमध्ये डिफेन्स फोर्स तैनात -

जुनागडचा नवाब महाबतखान यांच्या निर्णयामुळे काठियावाड मध्ये अराजकतेचे वातावरण निर्माण झाले. बाबरियावाड व मंग्रोल या दोन संस्थानामध्ये जुनागडने सैन्य पाठवून हे दोन्ही प्रदेश जुनागडचा अविभाज्य भाग आहे अशा स्वरूपाचे विधान केल्यामुळे समस्या गंभीर बनली म्हणून सरदार पटेलांनी परखड भूमिका घेवून काठियावाड क्षेत्रातील बिघडत चाललेली परिस्थिती लक्षात घेवून त्याठीकाणी शांतता प्रस्थापित करण्यासाठी व आजूबाजूच्या प्रदेशात स्थिरता प्राप्त करण्यासाठी काठियावाडमध्ये 'काठियावाड डिफेन्स फोर्स' या नावाने ओळखले जाणारे लष्कर तैनात केले.

• जुनागडच्या नवाबाचे कराचीला पलायन -

काठियावाड प्रजाजनाच्या संरक्षणासाठी भारतीय लष्कर सौराष्ट्रामध्ये दाखल होताच जुनागडचा नवाब घाबरला. त्याने आक्टोंबर महिन्याच्या शेवटी कराचीला पळून जाण्याचा निर्णय घेतला. पळून जात असतांना सोबत आपले कुटूंब, सर्व रोख रक्कम, खजिन्यामधील सर्व मौल्यवान वस्तु आणि आपली आवडती कुत्री घेवून नवाब महाबतखान पाकिस्तामध्ये कराचीला जावून पोहचला. पाकिस्तानमध्ये जाण्यापुर्वी त्याने जुनागडची सुत्रे दिवान शहानवाज भुट्टो यांच्याकडे सोपविली.

• नवाब महाबतखान यांच्या पलायनानंतरच्या घडामोडी -

जुनागडचा नवाब महाबतखान याला आपला पराभव दृष्टीपथात दिसू लागताच त्याने कराचीला पळून जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जुनागडची सुत्रे दिवान शहानवाज भुट्टो यांच्याकडे आली. दिवानाने बॅ. जीना यांना पत्र पाठवून मदतीची विनंती केली परंतु बॅ. जीना यांच्या कडून अपेक्षीत प्रतिसाद आला नाही. त्यानंतर दिवानाने स्टेट कौन्सीलचा सल्ला मागीतला.जुनागडच्या स्टेट कॉन्सीलने भारतात विलीन होण्याचा सल्ला दिल्यामुळे दिवान शहानवाज भुट्टो याने विभागीय आयुक्ताद्वारे भारत सरकारला या निर्णयाची माहीती दिली. त्यानंतर सरदार पटेल यांनी स्पष्ट भूमिका घेवून जुनागडचा कारभार विभागीय आयुक्त श्री. एन. एम. बुच यांना स्विकारण्याचे आदेश दिले. तसेच लॉर्ड माउंटबॅटन यांना कोणतीही पुर्व कल्पना न देता भारतीय लष्करांला जुनागडचा ताबा घेण्यासाठी आदेश देण्यात आले.

• सरदार वल्लभभाई पटेलांची जुनागडला भेट -

सरदार वल्लभभाई पटेल यांनी घेतलेल्या ठाम निर्णयामुळे जुनागड भारतात विलीन झाले. ९ नोव्हेंबर १९४७ रोजी विभागीय आयुक्तांनी जुनागडची सुत्रे स्विकारली. त्यानंतर १३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार वल्लभाई पटेल यांनी जुनागडला भेट दिली. त्यावेळी त्यांनी लोकांना मार्गदर्शन करून देश किंवा राष्ट्र कोणत्या एका व्यक्तीची खाजगी मालमत्ता नाही. ब्रिटिशांची सत्ता भारतामधून जनतेने केलेल्या आंदोलनामुळे गेली, हयाचा पुर्नउच्चार करून जनतेचे सर्वश्रेष्ठत्व स्पष्ट केले. तसेच सोमनाथ मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचा निर्णय पटेलांनी घेतला.

• जुनागडमध्ये सार्वमत -

जुनागडचे प्रशासक म्हणून आय. सी. एस. अधिकारी शिवेश्वरकर यांची नियुक्ती करून त्यानंतर लोकांना दिलेल्या आश्वासना नुसार वल्लभभाई पटेलांनी जानेवारी १९४८ च्या पहिल्या आठवडयात वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी सी. बी. नगरकर यांच्या निरिक्षणाखाली सार्वमत घेण्याची घोषणा केली. त्यानुसार २० फेब्रुवारी १९४८ रोजी जुनागडमध्ये सार्वमत घेण्यात आले. त्यामध्ये २ लाख १ हजार ४५७ मतदारांपैकी १ लाख ९० हजार ८७० लोकांनी मतदान केले त्यांपैकी फक्त ९० लोकांनी पाकिस्तानच्या बाजुने कौल दिला. जुनागडचे भारतात विलीनीकरण झाल्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होवू लागला. सर्व स्तरातून त्यांची प्रशंसा होवू लागली, काठियावाड प्रांताचा एकसंघपणा जपल्यामुळे काठियावाडमधील सर्व संस्थानिकांनी व

जनतेने वल्लभभाईचे आभार मानले कृतज्ञता व्यक्त केली. नवानगरच्या जामसाहेबांनी सरदार वल्लभभाई पटेलांचे संपूर्ण काठियावाड जनतेच्या वतीने अभिनंदन केले.

• **सारांश :** - १५ ऑगष्ट १९४७ रोजी जुनागडचा नवाब महबतखान याने आपले संस्थान पाकिस्तान मध्ये विलीन होत असल्याची घोषणा केली. त्यानंतर १३ सप्टेंबर १९४७ रोजी पाकिस्तानने जुनागडच्या विलीनीकरनास मान्यता दिली . फाळणीच्या नियमानुसार जुनागड संस्थान भौगोलिक दृष्ट्या कुठेही पाकिस्तानला जोडल्या जात नव्हते. ८० % प्रजा हिंदू होती. या पार्श्वभूमीवर काठीयावाड मधील संस्थानिक सरदार वल्लभभाई पटेल यांना भेटले त्यांनी तातडीने कारवाई करावी असे सांगितले. लॉर्ड माउंटबॅटन यांची भूमिका पाकिस्तानला अनुकूल होती. त्यांनी

जुनागडचा प्रश्न सयुंक्त राष्ट्रसंघाकडे नेण्याची सुचना केली. परंतु सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्याला स्पष्ट नकार देवून १७ सप्टेंबर १९४७ रोजी भारत सरकारच्या मंत्रिमंडळाचे बैठकीत बाबरियावाड मधील जुनागडच्या लष्करी आक्रमनाला प्रतिकार करण्यासाठी लष्कर पाठविण्याचा निर्णय सरदार वल्लभभाई पटेलांनी घेतला. त्यानुसार डिफेन्स फोर्स रवाना झाले. काठियावाड प्रजाजनाच्या संरक्षनासाठी भारतीय लष्कर सौराष्ट्रात दाखल होताच जुनागड नवाब आपला जीव वाचविण्यासाठी कराचीला पळून गेला. त्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्वतः जुनागडला भेट दिली. २० फेब्रुवारी १९४८ रोजी जुनागडमध्ये सार्वमत घेण्यात आले. त्यानुसार जुनागड भारतात विलीन झाले. एकूण जुनागडच्या विलीकरणामध्ये सरदार वल्लभभाई पटेलांची भूमिका निर्णायक ठरली.

**संदर्भग्रंथ –**


१. तळवळकर गोविंद, सत्तांतर १९४७ खंड -२, मौज प्रकाशन गिरगांव मुंबई, २०११,

२. महाजन व्ही. डी., प्राचीन भारत का इतिहास , एस.चंद अँड कंपनी लि. नवी दिल्ली, २००३.

३. पटेल रावजीभाई म., हिंद के सरदार, नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद, २०१४.

४. व्ही. शंकर (संपादक), सरदार पटेल चुना हुआ पत्रव्यवहार १९४५-१९५० खंड – १ नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद, २०११.

५. Menon V.P.. The story of the integration of the Indian states, Published by Longmans Green and Company, London, 1957.


Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana